ePaper

## “मी त्याचक्षणी राजकारणासह पत्रकारिता सोडेन”: संजय राऊत



| वर्ष - 7 । अंक - 285 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार दिनांक 2 मार्च 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत


- म्हणून रोहितला कर्णधार बनवलं !
- रवी किशन यांनी सांगितला ‘तेरे नाम’च्या सेटवरील अनुभव
- ऐंशीहून अधिक खासदारांना नारळ?


## निगडी ते दापोडी स्वंतत्र जलवाहिनीच्या कामाला गती

# दापोडी-सांगवीचा पाणी प्रश्न सुटणार!

### » माजी नगरसेविका स्वाती काटे यांचा यशस्वी पाठपुरावा


**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने निगडी ते दापोडी या ग्रेडसेपरेटर मार्गावर नव्याने स्वतंत्रपणे मुख्य जलवाहिनी टाकण्यात येणार आहे. या जलवाहिनीद्वारे दापोडी व सांगवी परिसराला पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा करण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. या कामासाठी माजी नगरसेविका स्वाती उर्फ माई काटे यांनी प्रशासनाने यशस्वी पाठपुरावा केला आहे.**









शहराची लोकसंख्या सुमारे ३० लाखांच्या घरात गेली आहे. पाण्याची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. पवना नदीतून शहरासाठी नियमितपणे ५१० एमएलडी, एमआयडीसीचे ३० एमएलडी आणि आंद्रा धरणाचे ५० एमएलडी असे एकूण ५९० एमएलडी पाणी सध्यस्थितीला शहराला कमी पडते. परिणामी, प्रशासनाला दिवसाआड पाणी पुरवठा करावा लागत आहे.

दरम्यान, दापोडी, सांगवी आणि परिसरातील पाणी समस्येवर तोडगा काढण्यासाठी निगडीच्या सेक्टर क्रमांक २३ येथील जलशुद्धीकरण केंद्रापासून ते दापोडीपर्यंत भूमिगत जलवाहिनी टाकण्यात येणार आहे. पाणी पुरवठा विभागाकडून १ हजार मिलिमीटर व्यासाची मुख्य जलवाहिनी असेल, शेवटच्या भागात जलवाहिनी ६०० मिलिमीटरची राहणार आहे. यासाठी महापालिका प्रशासनाने सुमारे ५८ कोटी रुपयांची निविदा प्रसिद्ध केली आहे. सदर जलवाहिनी निगडीच्या भक्ती-शक्ती समुह शिल्पाच्या बाजुने सर्व्हिस रस्त्याने दापोडीपर्यंत नेण्यात येणार आहे. या स्वतंत्र जलवाहिनीमुळे शहराचा शेवटच्या भागातील दापोडी व सांगवी परिसरातील पाणीपुरवठा सक्षम होण्यास मदत होणार आहे.



> “ शहराची गरज ओळखून निगडी ते दापोडी अशी स्वतंत्र जलवाहिनी टाकण्याबाबत महापालिका प्रशासनाने सातत्याने आम्ही पाठपुरावा केला. त्याला यश मिळाले. याबाबत महापालिका प्रशासनाचे आभार व्यक्त करते. या कामासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करून कालबद्ध पद्धतीने काम पूर्ण करावे. ज्यामुळे दापोडी आणि सांगवी परिसरातील पाणी पुरवठा सक्षम होईल.
>
> **-स्वाती काटे,** माजी नगरसेविका

## चऱ्होलीतील यशोभूमी सोसायटीत ‘पाणीसंकट’

### » महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष : रहिवाशांमध्ये प्रचंड नाराजी

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

यशोभूमी सोसायटी, वडमुखवाडी, चऱ्होली या सोसायटीमधे पाण्याची समस्या गंभीर आहे. सदर सोसायटीला पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे पाणी खूप कमी प्रमाणात मिळते. या सोसायटीच्या पाण्याच्या प्रश्नाबाबत हानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी प्रसाद आल्हाट यांना समक्ष सोसायटीमध्ये घेऊन जाऊन पाण्याच्या प्रश्नाची दाहकता प्रत्यक्ष दाखवली. मात्र, त्याबाबत आद्याप कार्यवाही झाली नाही.

यशोभूमी सोसायटीमध्ये २०० सदनिका आहेत. महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी दोन दिवसाचा वेळ मागितला आहे. दोन दिवसांमध्ये या सोसायटीचा पाण्याचा प्रश्न सोडवतो, असे आश्वासन महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिले आहे.



तसेच, जोपर्यंत सोसायटीचा पाण्याचा प्रश्न सुटत नाही. तोपर्यंत महानगरपालिकेद्वारे या सोसायटीला टँकरने पाणी पुरवण्याचे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी मान्य केले आहे व टँकर चालू केले आहेत. दोन दिवसांनी जर या सोसायटीचा पाण्याचा प्रश्न सुटला नाही, तर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेवर या सर्व महिला भगिनींना घेऊन जाऊन हंडा मोर्चा काढण्याचा इशारा रहिवाशांनी दिला आहे.

> “ चऱ्होलीमधील बऱ्याच सोसायटीमध्ये सध्या पाण्याची तीव्र समस्या जाणवत आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने बिल्डर कडून हमीपत्र लिहून घेतलेले आहे. भामा आसखेडचा टप्पा क्रमांक पाच आणि सहा पूर्ण होऊन महानगरपालिका पूर्ण क्षमतेने जोपर्यंत पाणी पुरवत नाही तोपर्यंत विकासाकांनीच स्वखर्चाने पाणी पुरवायचे आहे. परंतु, ना बिल्डर पाणी पुरवतो ना पिंपर- चिंचवड महानगरपालिका पाणी पुरवते आणि बिल्डरवर पाणी न पुरवल्यामुळे कोणती कारवाई केली जात नाही. त्यामुळे संबंधित बिल्डरवर भारतीय दंड संहिता कलम २०० प्रमाणे हमीपत्राचे उल्लंघन केले म्हणून गुन्हे नोंद करावेत.
>
> **- संजीवन सांगळे,** अध्यक्ष चिखली-मोशी-चऱ्होली-पिंपरी-चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन

# पुण्यात किती नगरसेवक होणार?

## » पुणे शहरातील प्रभागांची संख्या वाढण्याची शक्यता

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिकांमध्ये पुन्हा एकदा चार सदस्यीय प्रभाग पद्धत लागू करण्याचा निर्णयामुळे शहरातील शहरातील प्रभागांची संख्या एक किंवा दोनने वाढण्याची शक्यता आहे. तसेच 'एक वॉर्ड- एक नगरसेवक' या प्रभाग पद्धतीऐवजी चार सदस्यांचा एक प्रभाग ही रचना सत्ताधारी भारतीय जनता पक्षासाठी अनुकूल ठरण्याची शक्यता आहे.**




२०१४ पासून प्रभाग रचना निश्चित झाल्यानंतर महापालिकेत भाजपला सर्वाधिक ९८ जागा मिळाल्या असून, एक वॉर्ड एक नगरसेवक या रचनेत महापालिकेत भाजपला आत्तापर्यंत कमाल पंचवीस जागा मिळवता आल्या आहेत.मुंबई वगळता राज्यातील अन्य सर्व महापालिकांमध्ये चार सदस्यीय प्रभाग पद्धती लागू करण्याचा निर्णय राज्याच्या मंत्रिमंडळाने घेतला आहे. लांबणीवर पडलेली महापालिकेची निवडणूक कधी होणार हा प्रश्न कायम असला तरी बहुसदस्यीय प्रभाग रचना भाजपच्या पथ्यावर पडण्याची शक्यता आहे.वॉर्ड रचनेत भाजपला महापालिकेत आतापर्यंत सर्वाधिक २५, तर प्रभाग रचनेत ९९ जागा मिळाल्या आहेत. त्यापूर्वी झालेल्या निवडणुकीमध्ये भाजपला ६, ९, १४ अशा जागा मिळाल्या होत्या. ही बाब लक्षात घेऊन तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने वॉर्ड रचना आणण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर पुन्हा त्रिसदस्यीय प्रभाग पद्धतीचा निर्णयही घेण्यात आला होता. त्यामुळे भाजपला आव्हानाला सामोरे जावे लागण्याची शक्यता निर्माण झाली होती. मात्र चार नगरसेवकांचा एक प्रभाग ही पद्धती भाजपसाठी अनुकूल ठरणार आहे. बहुसदस्यीय प्रभाग रचनेबरोबरच प्रभागाच्या सीमा आणि परिक्षेत्रात येणाऱ्या लोकांची समाजवैशिष्ट्ये निवडणुकीच्या दृष्टीने महत्त्वाची ठरत असल्याने भजपला मतांचे ध्रुवीकरण करता येणे शक्य ठरत आहे. चार नगरसेवकांमुळे प्रभागाचा आकार वाढत असल्याने मतदारही वाढत असल्याने भाजपचे उमेदवार निवडून येण्याची शक्यताही वाढीस लागणार आहे.चार सदस्यीय प्रभाग पद्धतीमुळे शहरातील प्रभागांची संख्या एक किंवा दोनने वाढेल, असा अंदाज आहे. गेल्या पंचवार्षिक निवडणुकीत १६४ नगरसेवक ४१ प्रभागातून निवडून आले होते. त्यातील ३९ प्रभाग हे चार नगरसेवकांचे, तर दोन प्रभाग तीन नगरसेवकांचे होते. महापालिका हद्दीत ऑक्टोबर २०१७ मध्ये अकरा गावांचा समावेश करण्यात आल्यानंतर या अकरा गावांसाठी एक प्रभाग करण्यात आला. त्यामुळे या प्रभागातून दोन नगरसेवक निवडून आले. त्यामुळे महापालिकेत ४२ प्रभाग आणि १६६ नगरसेवक होते. त्यानंतर अलीकडच्या काही वर्षात महापालिकेत पुन्हा २४ गावे समाविष्ट करण्यात आली आहेत. दोन प्रभाग होतील, असा प्रशासकीय अंदाज आहे. तसेच नगरसेवकांची संख्याही तीन ते चारने वाढणार आहे.त्यानुसार पुणे महापालिकेत ५८ प्रभागातून १७३ नगरसेवक निवडून दिले जाणार होते. निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार महापालिकेने प्रभाग रचना अंतिम केली होती, पण या प्रभाग रचनेवरून न्यायालयात याचिका दाखल झाल्याने निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या.

### असे आहे प्रभाग रचनेचे गणित

» आता या निवडणुका फेब्रुवारी २०२५ मध्ये होण्याची शक्यता आहे. दरम्यान राज्य सरकारने गुरुवारी (ता. २९) राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत तर आज (ता.१) विधीमंडळात यासंदर्भातील विधेयक मंजूर केले.मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या २०१६ कायद्यातील सुधारित तरतुदीनुसार महापालिकेत ३० लाख लोकसंख्येला १६१ नगरसेवक आणि त्या पुढील प्रत्येक १ लाख लोकसंख्येसाठी एका नगरसेवकाची संख्या वाढवली जाते. आगामी महापालिका निवडणुका या २०११ च्या जनगणनेच्या आधारावर होणार आहे. तेव्हा पुणे शहराची लोकसंख्या ३१ लाख २४ हजार इतकी होती.

# मेफेड्रोन प्रकरणात पोलीस उपनिरीक्षकाचा सहभाग?

## » निगडी पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षकाचे नाव समोर

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दोन कोटी रूपये किमतीचे मेफेड्रोन (एमडी) अमली पदार्थ विक्री प्रकरणात धक्कादायक माहिती पुढे येत आहे. हॉटेल कामगाराला पोलिसांनी अटक केल्यानंतर त्याच्या चौकशीतून निगडी पोलीस ठाण्यातील एका पोलीस उपनिरीक्षकाचे नाव समोर आले आहे.**



उपनिरीक्षकाचा या प्रकरणात थेट सहभाग असल्याचा संशय असल्याने त्याची चौकशी सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. नमामी शंकर झा (वय ३२, रा. निगडी. मूळ रा. बिहार) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. आरोपी नमामी हा एका हॉटेलमध्ये कामाला आहे. या प्रकरणात निगडी पोलीस ठाण्यात नियुक्तीस असणाऱ्या एका उपनिरीक्षकाची कसून चौकशी सुरू करण्यात आली आहे. आरोपी नमामी याला पिंपळे निलख विशालनगर परिसरात मेफेड्रोन (एमडी) अमली पदार्थ विक्रीसाठी आला असताना पोलिसांनी त्याला सापळा रचून पकडले. त्याच्या कडील सफेद रंगाच्या पिशवीत दोन कोटी दोन लाख रुपये किमतीचे एकूण २ किलो ३८ ग्रॅम वजनाचे मेफेड्रोन (एमडी) अमली पदार्थ जप्त करण्यात आले..एवढ्या मोठ्या प्रमाणात मेफेड्रोन कोठून आणले याची विचारणा पोलिसांनी केल्यावर नमामीने निगडी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या एका पोलीस उपनिरीक्षकाचे नाव घेतले आहे. सांगवी पोलिसांनी याबाबतची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिली. त्यानंतर संबंधित उपनिरीक्षकाला सांगवी पोलीस ठाण्यात बोलाविण्यात आले. त्याची सकाळपासून चौकशी सुरू होती. मात्र, संबंधित उपनिरीक्षकाचा नमामी याच्याशी कसा संपर्क आला. नमामीने दोन कोटी २ लाख रुपये किमतीचे मेफेड्रोन (एमडी) अमली पदार्थ कोठून आणले हे अद्याप स्पष्ट झाले नाही. उपनिरीक्षकाचा या प्रकरणात नेमका संबंध काय आहे, हे देखील अद्याप समजू शकलेले नाही. याबाबत कोणत्याही अधिकाऱ्याने अधिकृत माहिती दिलेली नाही. मात्र, उपनिरीक्षकाचा अमली पदार्थ प्रकरणाशी संबंध उघड होत असल्याने एकच खळबळ उडाली आहे.

### आरोपी एका हॉटेलमध्ये कामाला

» आरोपी नमामी हा एका हॉटेलमध्ये कामाला आहे. या प्रकरणात निगडी पोलीस ठाण्यात नियुक्तीस असणाऱ्या एका उपनिरीक्षकाची कसून चौकशी सुरू करण्यात आली आहे. आरोपी नमामी याला पिंपळे निलख विशालनगर परिसरात मेफेड्रोन (एमडी) अमली पदार्थ विक्रीसाठी आला असताना पोलिसांनी त्याला सापळा रचून पकडले. त्याच्या कडील सफेद रंगाच्या पिशवीत दोन कोटी दोन लाख रुपये किमतीचे एकूण २ किलो ३८ ग्रॅम वजनाचे मेफेड्रोन (एमडी) अमली पदार्थ जप्त करण्यात आले..एवढ्या मोठ्या प्रमाणात मेफेड्रोन कोठून आणले याची विचारणा पोलिसांनी केल्यावर नमामीने निगडी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या एका पोलीस उपनिरीक्षकाचे नाव घेतले आहे.

# माजी आमदार विलास लांडेंची गाडी चुकली;

# शरद पवारांना उमेदवार नव्हे पाठीराखा हवा !

## महाविकास आघाडीकडून उमेदवारीबाबत अनिश्चितता कायम

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिरूर लोकसभेसाठी महायुतीमधून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून उमेदवारीचा विचार न झाल्याने माजी आमदार विलास लांडे यांनी खासदार शरद पवार यांच्याशी जवळीक साधली आहे. चिंचवड मधील एका कार्यक्रमात खासदार शरद पवारांचे कौतुक करून उमेदवारीबाबत मी सक्षम असल्याचे लांडे यांनी निदर्शनास आणून दिले. मात्र तीन हजार कामगारांची कंपनी चालविणारे विलास लांडे हे खासदार अमोल कोल्हे यांचे आगामी निवडणुकीत पाठीराखे होतील, असे वक्तव्य करत खासदार शरद पवार यांनी लांडे यांच्यावरच गुगली टाकली. दोन्ही पक्षाकडून माजी आमदार लांडे यांची तिकीटाची शक्यता धूसर झाली आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत ते नेमका कोणता राजकीय डाव आखतात? हे पाहावे लागणार आहे.**






### संदिग्ध भूमिकेचा विलास लांडे यांना फटका ?

**राष्ट्रवादीत फूट पडल्यापासून लांडे हे नेमके कोणासोबत आहेत हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. ते स्पष्ट होऊ न देण्याचे राजकीय कसब लांडे यांचे आहे. पिंपरी चिंचवड शहरात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सोबत प्रत्येक कामात ते उपस्थित राहत आहेत. तर दुसरीकडे खेड आळंदीमधून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी खासदार शरदचंद्र पवार यांच्या पक्षातून तयारी करणाऱ्या आपले भाचेजावई सुधीर मुंगसे यांचा प्रचार करत आहेत. तिथे उपमुख्यमंत्री अजित पवार समर्थक आमदार दिलीप मोहिते यांना ते आव्हान देत आहेत. त्यांच्या या संदिग्ध भूमिकेमुळे अनेक जण त्यांच्यावर नाराजी व्यक्त करत आहेत. परिणामी त्यांना उमेदवारीला डावलले जात असल्याचा फटका त्यांना बसत असल्याचे राजकीय जाणकारांचे म्हणणे आहे.**

शिरूर लोकसभेसाठी माजी आमदार विलास लांडे यांनी सातत्याने शड्डू ठोकला आहे. या पूर्वीही २०१९ मध्ये त्यांना तयारी करण्याच्या सूचना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने दिल्या होत्या. त्यानुसार मतदारसंघात त्यांनी फ्लेक्सबाजी करून लोकसभेच्या रणांगणात राजकीय एंट्री केली होती. मात्र ऐनवेळी उमेदवारीची माळ खासदार अमोल कोल्हे यांच्या गळ्यात पडली. तेव्हापासून लांडे सातत्याने या मतदारसंघावर आपला दावा सांगत आहेत. सध्या लोकसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहे. त्यानुसार लांडे यांनी महायुतीमधून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून उमेदवारी मिळविण्यासाठी प्रयत्न केले. मात्र माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, प्रदीप कंद यांचे नाव आघाडीवर असल्याने लांडे यांच्या उमेदवारीची शक्यता धूसर झाली आहे.

त्यामुळे चाणाक्ष राजकारणी असलेल्या लांडे यांनी राजकीय खेळी करण्यास सुरुवात केली आहे. खासदार शरद पवार, शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांच्या उपस्थितीत झालेल्या दिवंगत खासदार गजानन बाबर यांच्यावरील पुस्तकच्या प्रकाशन कार्यक्रमात लांडे यांनी उपस्थिती दर्शवली. त्यांची उपस्थिती अनेकांच्या भुवया उंचावणारे ठरत आहे. या कार्यक्रमात त्यांची राजकीय फटकेबाजी चांगलाच चर्चेचा विषय ठरला. या वेळी शहराच्या विकासात खासदार शरद पवार यांचे महत्व विशद करत त्यांचे कौतुक लांडे यांनी केले. या भाषणाने उपमुख्यमंत्री अजित पवार गटात अस्वस्थता पसरविण्यात ते यशस्वी झाल्याचे बोलले जात आहे. तर खासदार शरद पवार यांच्या पक्षाकडून तिकीट मिळण्याची देखील त्यांनी या निमित्त चाचपणी केली. मात्र लांडे यांच्या राजकीय खेळींचा अंदाज असलेल्या शरद पवार यांनी लांडे यांच्यावरच गुगली टाकत त्यांच्या उमेदवारीच्या अपेक्षेवर अप्रत्यक्ष पाणी टाकले. लांडे यांच्या भाषणाचा धागा पकडून खासदार पवार म्हणाले की, लांडे यांची तीन हजार कामगार असणारी कंपनी असल्याचे आताच समजले. त्यामुळे माझ्या डोक्यावरील ओझे कमी झालेले असून खासदार अमोल कोल्हे यांच्यासाठी खर्च करणारा पाठीराखा मला मिळाला आहे. खासदार पवार यांच्या या वक्तव्याने सभागृहात हशा पिकला असला तरी त्यांना नेमकं काय म्हणायचे आहे हे उपस्थित लोकांसह माजी आमदार लांडे यांनाही कळून चुकले आहे.

---

# देहूरोड कँटोन्मेंटच्या कच-याबाबत उपापयोजना करा!

## संजोग वाघेरे पाटील : महानगरपालिका व देहूरोड कँटोन्मेंट प्रशासनाला पत्र

। पिंपरी।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**देहूरोड कँटोन्मेंट बोर्डाच्या हद्दीत निर्माण होणारा कचरा निगडी भक्ती-शक्ती चौकापासून जवळच टाकला जातो. तेथून निघणाऱ्या दुर्गंधी व धुरामुळे नगारिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. या संदर्भात गांभीर्याने विचार करून कचरा समस्येवर उपापयोजना कराव्यात, अशी मागणी शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) मावळ लोकसभा संघटक संजोग वाघेरे पाटील यांनी केली आहे.**




### प्रशासनाविरुध्द जनांदोलनाचा इशारा



**या कचरा समस्येबाबत महानगरपालिका व कॅन्टोमेंट बोर्ड प्रशासन कोणताही ठोस उपाययोजना अंवलंबविल्या जात नाहीत. नागरिकांच्या आरोग्यासाठी, तसेच शहराच्या हितासाठी दोन्ही प्रशासनाने संयुक्तपणे या बाबत धोरणात्मक निर्णय घ्यावा. नागरिकांची या समस्येपासून सुटका करावी, अन्यथा परिसरातील नागरिकांसह प्रशासनाविरुध्द जनआंदोलन करावे लागेल, असा इशारा या निवेदनाद्वारे संजोग वाघेरे पाटील यांनी दिला आहे.**

या संदर्भात पिंपरी चिंचवड महानगरपालिका व देहूरोड कँटोन्मेंट बोर्ड यांना संजोग वाघेरे पाटील यांनी निवेदन दिले आहे. त्यांनी म्हटले आहे की, "देहूरोड कँटोन्मेंट बोर्डाच्या हद्दीत निर्माण होणारा कचरा निगडीतील भक्ती-शक्ती चौकापासून जवळ असलेल्या लष्कराच्या माळरानावर टाकलो जातो. तेथे कचरा पेटल्यामुळे अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. तेथे निघणाऱ्या दुर्गंधी व धुरामुळे पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील निगडी, रुपीनगर, यमुनानगर, त्रिवेणीनगर आणि निगडी णातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. परिसरात प्रचंड मोठा जनसमुदाय वास्तव्यास आहे. कचऱ्याच्या अशुद्ध हवेमुळे परिसरातील स्वच्छ हवा प्रदूषित होऊन नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न उपस्थित होत आहे. याचा सर्वात जास्त त्रास लहान मुलं, वृद्धांना होत असून, श्वसनाची गंभीर समस्या उद्भवत आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात व्यावसायिक केंद्रही आहेत. त्यांनाही या समस्येचा त्रास होत आहे. कारणामुळे बहुतांशी आस्थापनांनी या परिसरातून काढता पाय घेतला आहे. ती चाकण औद्योगिक परिसरात स्थलांतरीत झाली आहेत. त्यामुळे महापालिकेच्या महसुली उत्पन्नावरही त्याचा परिणाम झाला आहे. नागरिक सातत्याने नाराजी व्यक्त करत आहेत".



भूमिका

# मोदी 370 जागा जिंकतील का?

**चंडीगड नगरपालिकेतील जनादेश बदलणे आणि आयकर विभागाने काँग्रेसचा निधी गोठवणे अशा तुलनेत क्षुल्लक कृत्यांमुळे मोदींनी मिळवलेले सर्व फायदे निष्प्रभ झाले आहेत. नरेंद्र मोदी आणखी पाच वर्षांसाठी पंतप्रधानपदी विराजमान होतील याबाबत मला कोणतीही शंका नाही.**

पण भाजप लोकसभेत ३७० जागा जिंकेल आणि एनडीएमधील त्यांचे सहकारी पक्ष ३० जागा जिंकतील, या त्यांच्या भाकिताबाबत मात्र माझ्या मनात अनेक प्रश्न आहेत. महाराष्ट्रात लोकसभेच्या ४८ जागा आहेत. इथे काँग्रेस, शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना हे तिघेही आपापल्या प्रभावक्षेत्रात काही जागा जिंकतील. भाजपने ग्रामीण भागातील मतदारसंघात आपली जागा निर्माण केली आहे. शिवसेनेतील शिंदे गट आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी हे भाजपचे नवे मित्र विरोधकांपेक्षा काही अधिक जागा जिंकतील, पण मोदी सांगत आहेत, तेवढ्या जागा त्यांना नक्कीच मिळणार नाहीत.



हिंदी भाषिक पट्टा निश्चितपणे भाजपच्या बाजूने आहे, पण भाजपने तिथल्या बहुतांश जागा आपल्याच खिशात आहेत, असे मानून वावरणे तितकेसे योग्य ठरणार नाही. शेतकऱ्यांचे पुन्हा नव्याने सुरू झालेले आंदोलन मुख्यत्वे पंजाबपुरते मर्यादित आहे आणि पंजाबात भाजपचा फारसा प्रभाव नाही. चौधरी चरणसिंग यांच्यासारख्या मोठ्या नेत्याला भारतरत्न देऊन त्यांचा अभिमान बाळगणाऱ्या हरियाणा आणि उत्तर प्रदेशातील जाट शेतकऱ्यांना भाजपने आपल्याकडे वळवून घेतले आहे. लोकसभेच्या निवडणुका जाहीर होण्यापूर्वीच हा पुरस्कार जाहीर करणे ही अतिशय चपखल चाल होती. पण चंडीगड महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या निकालांशी खेळ करण्याचा प्रयत्न ही मात्र अजिबातच चतुर चाल नव्हती. त्याचा परिणाम असा झाला की सर्वोच्च न्यायालयाने संबंधित निवडणूक अधिकाऱ्यावर खटला चालवण्याचे आदेश दिले. आधी निवडणूक रोखे प्रकरणातील निकाल आणि नंतर चंडीगड महापौरपदाच्या निवडणुकीसंदर्भातील निकाल या दोन्ही गोष्टींनी सत्ताधारी भाजप अशा पळवाटा शोधण्यापासून परावृत्त होणे अपेक्षित आहे. चंदीगड महापौर निवडणूक प्रकरणातील निकालात संबंधित निवडणूक अधिकाऱ्याबाबत जे झाले त्यामुळे सत्ताधाऱ्यांशी निष्ठा बाळगू इच्छिणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांना योग्य तो इशारा मिळालेला असू शकतो. सत्ताधारी पक्षाला डोळे झाकून मदत करण्याच्या कार्पोरेट् कंपन्यांच्या इच्छेवरही निवडणूक रोखे प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचे सावट पडले आहे. टाटा तसेच आदित्य बिर्ला समूहाच्या पद्धतीचे या सगळ्याच कार्पोरेट कंपन्यांनी अनुकरण करणे आवश्यक आहे. हे दोन्ही समूह चेकद्वारे सर्व राजकीय पक्षांना देणग्या देत. निवडणूक रोख्यांची पद्धत सुरू होईपर्यंत हीच पद्धत सगळीकडे अवलंबली जात होती. लाटेवर स्वार होऊन सत्तेत आलेल्या विशेषत: भाजपसारख्या पक्षाला कार्पोरेट् कंपन्यांकडून अधिकाधिक देणग्या मिळणे हे स्वाभाविक आहे. पण सत्ताधारी पक्षाने विरोधी पक्षांच्या निधीची गळचेपी करण्यासाठी सरकारी यंत्रणांचा वापर करणे हे योग्य नाही. लोकसभा निवडणुकीच्या दोन महिने अगोदर आयकर अधिकाऱ्यांनी काँग्रेस पक्षाची बँक खाती गोठवणे ही अत्यंत क्षुद्र चाल होती आणि अगदी भाजप समर्थकांनाही ती पटली नाही. आयकर अपील न्यायाधिकरणाच्या हस्तक्षेपामुळे गोष्टी बदलल्या. अयोध्येतील रामजन्मभूमी मंदिरात रामाच्या मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेप्रसंगी नरेंद्र मोदी महापुरोहिताच्या भूमिकेत होते. भारतातील बहुसंख्य हिंदू २२ जानेवारीच्या कार्यक्रमाच्या वैभवशाली स्वरुपामुळे प्रभावित झाले होते. त्यामुळे मोदींच्या लोकप्रियतेतत वाढ झाली. हेरगिरीचा संशयावरून मृत्युदंडाची शिक्षा झालेल्या आठ माजी नौदल कर्मचाऱ्यांच्या सुटकेची विनंती करण्यासाठी ते कतारला गेल्यामुळे तर या गौरवशाली क्षणाची पुनरावृत्ती झाली. मध्यपूर्वेतील मुस्लिम जगतात देशाची सॉफ्ट पॉवर दाखवून देण्याच्या आपल्या मोहिमेत आपले पंतप्रधान अशा पद्धतीने यशस्वी झाले. पण दुर्दैवाने, चंडीगड नगरपालिकेतील जनादेश बदलणे आणि आयकर विभागाने काँग्रेसचा निधी गोठवणे अशा तुलनेत क्षुल्लक कृत्यांमुळे मोदींनी मिळवलेले सर्व फायदे निष्प्रभ झाले आहेत.

## संपादकीय »

# दादांचे पत्र!

***अजितदादांच्या पत्राची आता गरज काय, हा संभ्रम कायम राखूनही पहाट, अपघात, सत्तेची जोड यांविषयी या पत्रातील विधाने फारच प्रांजळ..***

राज्यातील आणि राज्याबाहेरीलही, किंबहुना पृथ्वीतलावरील, समस्त मराठीजनांस सध्या गहिवर अनावर झाला असून प्रत्येक सुजाण, साक्षर नागरिक स्वत:चे तरी डबडबलेले डोळे पुसताना दिसतो. त्याच्या डोळ्य़ातील अश्रूंमागे हवेत झालेली धूलिकणांची वाढ हे कारण नाही. काही महिन्यांपूर्वी ते कारण होते हे खरे. तथापि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रामप्रहरी स्वत: मैदानात (पक्षी : रस्त्यावर) उतरून हाती जलवाहिका (पक्षी : पाइप) घेऊन 'खोलवर धुलाई' (पक्षी : डीप क्लीनिंग) सुरू केल्याचे पाहून हवेतील धूलिकण, ईडीच्या चरणांवर विरोधी राजकारणी पडावेत तसे आपोआप धारातीर्थी पडू लागले आणि पाहता पाहता हवेतील काढलेली टेंडरे नव्याजनप्रिय लोकप्रतिनिधी पाहून महाराष्ट्रीय जनतेच्या भावना उचंबळून आल्या आणि त्या नयनमार्गिकेद्वारे वाहू लागल्या असेही नाही.

**मुंबईत अंधेरी या सर्वाधिक गर्दीच्या उपनगराचे पूर्व आणि पश्चिम भाग जोडणारा गोखले पूल काही दिवसांपूर्वी अर्धवटच सुरू झाला आहे. या पुलावरची पहिली दुर्घटना सन २०१८ मध्ये झाली होती. त्यानंतर जुना पूल बंद करून, तो पाडून आणि नवा बांधलेला निम्मा पूल वाहतुकीस खुला करण्यास मुंबई महापालिकेला एकूण सहा वर्षे लागली आहेत.**

# गोखले पूल सुरु होऊनही दिलासा नाही

आता उरलेला निम्मा पूल कधी खुला होणार हा प्रश्नच असला, तरी या नव्या पुलाने एक नवाच घोळ जन्माला घातला आहे. आधीचा गोखले पूल हा समांतर जाणाऱ्या बर्फीवाला फ्लायओव्हरशी जोडलेला होता. हा फ्लायओव्हर एसव्ही रोड या अतिशय गर्दीच्या रस्त्याच्या वरून जात असल्याने वाहतुकीची कोंडी काही प्रमाणात टळत होती. थोडक्यात, गोखले पूल आणि बर्फीवाला फ्लायओव्हर हे परस्परांशी जोडलेले असल्याने काही प्रमाणात वाहतूक सुरळीत होत होती. आता नवा झालेला गोखले पूल हा बर्फीवाला पुलापेक्षा तब्बल दीड मीटर उंचावरून जातो. मुंबई महापालिकेला रेल्वे खात्याच्या नव्या नियमावलीनुसार जुन्या पुलाची उंची वाढवून नवा पूल बांधावा लागला आहे, असे सांगितले जाते. मात्र, हे करताना दोन्ही पूल जोडण्याची खबरदारी घेता आली असती. ती घेतली न गेल्याने गोखले पूल सुरू होऊनही हजारो वाहनचालकांना दिलासा मिळालेला नाही. हा मुंबई महापालिकेच्या



अकार्यक्षमतेचा आणि मूर्खपणाचा कळस म्हणावा लागेल.स्वातंत्र्यापूर्वी भारतीय लोकजीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात मूलभूत काम करणाऱ्या अनेकानेक संस्था आणि संघटना जन्माला घालणारे, आपल्या बौद्धिक पराक्रमाने ब्रिटिशांना तोंडात बोट घालायला लावणारे, महात्मा गांधी यांना गुरुस्थानी असणारे आणि आधुनिक भारताचा इतिहास ज्यांच्या नावाविना अपुरा राहील, अशा नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचे नाव या जुन्या पुलास देण्यात आले होते.

हा जुना पूल तर अपेक्षेपेक्षा आधीच कमकुवत झाला; पण त्या जागी नवा पूलही कमालीच्या दिरंगाईने उभा राहिला. आणि तो उभा राहिला तेव्हा त्याचे उंच थोटेपण नवाच त्रास घेऊन आले. सामान्य नागरिकांचा छळ आणि महापुरुषांचा मरणोत्तर घोर अपमान हे दोन्ही एकाच वेळी करून दाखविणाऱ्या मुंबई महापालिकेचे आणि तिच्यावर सातत्याने मायेची पाखर घालणाऱ्या राज्य सरकारचे कौतुक करावे तितके थोडेच आहे! मुंबई महापालिकेचा कारभार बराच काळ निर्वाचित सदस्यांच्या हाती नसल्याने आणि नोकरीत निवड होतानाच इतरांपेक्षा जास्त शहाणे असणारे अधिकारी कारभार हाकत असल्याने तो बरा होईल, असा काहींचा विश्वास होता. या विश्वासाचे थडगे महापालिकेने उभारून दाखविले आहे. रेल्वे खात्याची अट समजण्यासारखी आहे. आता दोन पुलांमध्ये पडलेले जवळपास दीड मीटरचे अंतर भरून काढण्यासाठी मुंबईतील नामांकित तंत्रशिक्षण आणि संशोधन संस्थांची मदत घेणार असल्याचे सांगण्यात येत आहे. हे आधीच करता आले नसते का? बर्फीवाला उड्डाणपुलाचे मूळ नकाशेच महापालिकेत गायब असल्याचे काही जण सांगत आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# भाजपाला एकट्यालाच जीवंत राहायचंय?

## काही जागांवरून महायुतीत तणाव निर्माण झाल्याचं

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणूक अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. त्यामुळे देशभरातील विविध पक्ष निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत. युत्या आणि आघाड्यांमध्ये जागावाटपासाठी बैठका चालू आहेत. महाराष्ट्रात महायुतीत भारतीय जनता पार्टी, शिवसेनेचा शिंदे गट, राष्ट्रवादीचा अजित पवार गट आणि इतर लहान पक्ष आहेत. या पक्षांमध्ये सध्या वाटाघाटी चालू आहेत. तसेच लोकसभा निवडणुकीनंतर काहीच महिन्यात विधानसभा निवडणूकही होणार आहे. त्यामुळे विधानसभेबाबतही विचार चालू आहे. अशातच काही जागांवरून महायुतीत तणाव निर्माण झाल्याचं चित्र पाहायला मिळत आहेत.**



शिवसेना पक्ष फुटून दोन गट पडले आहेत. त्यापैकी एक गट महायुतीत आहे. संयुक्त शिवसेनेच्या ५५ आमदारांपैकी ४० आमदार शिवसेनेच्या शिंदे गटात आहेत. तर १५ आमदार शिवसेनेच्या ठाकरे गटात आहेत. तसेच संयुक्त शिवसेनेच्या १८ खासदारांपैकी १३ खासदार शिंदे गटात, तर ५ खासदार ठाकरे गटात आहेत. अशातच जे आमदार आणि खासदार ठाकरे गटात आहेत त्यांच्या जागा आपल्याला मिळाव्या यासाठी भाजपाकडून प्रयत्न चालू असल्याची चर्चा आहे. भाजपाला शिवसेनेसह राष्ट्रवादीच्या काही जागा हव्या आहेत. त्यासाठी महायुतीत वाटाघाटी चालू असल्याचं बोललं जात आहे. परंतु, यावर शिवसेनेच्या शिंदे गटाने तीव्र संताप व्यक्त केला आहे.शिवसेनेच्या शिंदे गटातील नेते रामदास कदम यांनी जागावाटपावर भाष्य केलं आहे. रत्नागिरी मतदारसंघ मिळावा यासाठी भारतीय जनता पार्टी प्रयत्न करत आहे. यावर रामदास कदम म्हणाले, भाजपा रायगड आणि रत्नागिरीच्या जागेसाठी अग्रही आहे म्हणे... तुम्ही (भाजपा) रायगडमध्ये सांगाल आम्हीच... उद्या म्हणाल रत्नागिरीतही आम्हीच... त्यामुळे मला त्यांना सांगायचं आहे की, असं होत नसतं. रत्नागिरी ही आमची जागा आहे. तिथे आमचा उमेदवार निवडून आला आहे.

त्या जागेवर पूर्णपणे शिवसेनेचा अधिकार आहे. तुम्ही रत्नागिरीची जागा मागाल, रायगडची जागा मागाल, तुम्हाला (भाजपाला) सर्व पक्षांना संपवून एकट्यालाच जीवंत राहायचं आहे का?भाजपाविरोधात अधिक आक्रमक होत रामदास कदम म्हणाले, या सगळ्यावरून असा निष्कर्ष निघेल की, सर्वांना संपवून भाजपालाच जीवंत राहायचं आहे. परंतु, असं होणार नाही. आपण दोघे भाऊ-भाऊ, तुझं आहे ते वाटून खाऊ आणि माझ्याला हात नको लावू... असं चालणार नाही. महायुतीत असं होता कामा नये.

### माझं ते माझंच आणि तुझं तेही माझंच?

भाजपाला शिवसेनेसह राष्ट्रवादीच्या काही जागा हव्या आहेत. त्यासाठी महायुतीत वाटाघाटी चालू असल्याचं बोललं जात आहे. परंतु, यावर शिवसेनेच्या शिंदे गटाने तीव्र संताप व्यक्त केला आहे.शिवसेनेच्या शिंदे गटातील नेते रामदास कदम यांनी जागावाटपावर भाष्य केलं आहे. रत्नागिरी मतदारसंघ मिळावा यासाठी भारतीय जनता पार्टी प्रयत्न करत आहे. यावर रामदास कदम म्हणाले, भाजपा रायगड आणि रत्नागिरीच्या जागेसाठी अग्रही आहे म्हणे... तुम्ही (भाजपा) रायगडमध्ये सांगाल आम्हीच... उद्या म्हणाल रत्नागिरीतही आम्हीच... त्यामुळे मला त्यांना सांगायचं आहे की, असं होत नसतं. रत्नागिरी ही आमची जागा आहे. तिथे आमचा उमेदवार निवडून आला आहे.

कुठल्याही परिस्थिती रत्नागिरीची जागा आम्ही सोडणार नाही. ती जागा आम्ही लढवणारच. ती आमच्या हक्काची जागा आहे. तिथे आमचा उमेदवार निवडून आला आहे.रामदास कदम म्हणाले, रत्नागिरी-सिंधुदुर्गचे विद्यमान खासदार आमच्या पक्षाच्या तिकीटावर निवडून आले आहेत. विद्यमान खासदारांची निवडणुकीआधीची शेवटची सभा मी स्वतः घेतली होती. मी सावंतवाडीला जाऊन शिवसेना उमेदवारासाठी प्रचारसभा घेतली होती. आम्ही आमच्या हक्काची जागा का सोडावी? आमच्या या भूमिकेमुळे युतीत अजिबात फूट पडणार नाही. प्रत्येकाला वाटतं की, माझा पक्ष मोठा झाला पाहिजे. त्यामुळे असा विषय काढून प्रयत्न केला जातो. हळूच विचारून पाहू... जमलं तर जमलं... असा असा प्रकार केला जातो. याचा अर्थ माझं आहे ते माझंच आहे आणि तुझं आहे ते पण माझंच आहे. राजकारणात असं कधी होत नाही. पडले आहेत. त्यापैकी एक गट महायुतीत आहे. संयुक्त शिवसेनेच्या ५५ आमदारांपैकी ४० आमदार शिवसेनेच्या शिंदे गटात आहेत. तर १५ आमदार शिवसेनेच्या ठाकरे गटात आहेत. तसेच संयुक्त शिवसेनेच्या १८ खासदारांपैकी १३ खासदार शिंदे गटात, तर ५ खासदार ठाकरे गटात आहेत. अशातच जे आमदार आणि खासदार ठाकरे गटात आहेत त्यांच्या जागा आपल्याला मिळाव्या यासाठी भाजपाकडून प्रयत्न चालू असल्याची चर्चा आहे.

# ...तर आम्ही भाजपा-आरएसएसबरोबर जाऊ शकतो

## वंचित बहुजन आघाडी महाविकास आघाडीसमोर नव्या अटी

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**प्रकाश आंबेडकरांचा वंचित बहुजन आघाडी हा पक्ष महाविकास आघाडीत सहभागी झाला असला तरी अद्याप मविआकडून वंचितला योग्य वागणूक मिळाली नसल्याची तक्रार वंचितच्या नेत्यांनी केली आहे. महाविकास आघाडीत अद्याप जागावाटप झालेलं नाही.**



मतदारसंघांसाठी रस्सीखेच चालू आहे. अशी तक्रार करत प्रकाश आंबेडकर यांनी मविआ नेत्यांवर नाराजी व्यक्त केली आहे. दुसऱ्या बाजूला भाजपाही प्रकाश आंबेडकर यांनी महायुतीत यावं यासाठी प्रयत्न करत आहे. या पत्रात त्यांनी पंतप्रधान मोदी आणि शाह यांच्या कार्यप्रणालीशी आपली कार्यप्रणाली मिळतीजुळती असल्याचे म्हटले होते. त्यावर आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांनी टोला लगावला आहे. वंचित बहुजन आघाडी ही महाविकास आघाडीबरोबर राहील की नाही याबाबत अनेकजण साशंक असतानाच वंचितचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. प्रकाश आंबेडकर म्हणाले, आम्ही सुधारणांमध्ये विश्वास ठेवतो. समाज सुधारणं ही आमची प्राथमिकता आहे. राजकीय पक्ष म्हणून काम करत असताना आमचे काही राजकीय अजेंडे असले तरी आमच्यासाठी सामाजिक सुधारणा अधिक महत्त्वाची आहे.प्रकाश आंबेडकर म्हणाले, “सामाजिक सुधारणा करता करता जर आम्हाला सत्ता मिळाली तर आम्ही निश्चितपणे त्या सत्तेचा स्वीकार करू. आत्ता आपल्या देशात पौरोहित्य आणि धार्मिक विधींच्या अधिकारांबाबत मोठ्या सुधारणा होणं आवश्यक आहे.

### आमचा पुरोहितशाहीला विरोध

प्रकाश आंबेडकर म्हणाले, आपल्या देशात जे पुजारी, पुरोहित किंवा धार्मिक विधी करणारी जी मंडळी आहे, ती जातीच्या आधारावर आहे. म्हणजेच आज कुंभाराचा पुरोहित त्यांच्या जातीपुरता, लोहाराचा पुरोहित त्यांच्या जातीपुरता मर्यादित आहे. त्या-त्या पुरोहितांना त्यांच्या त्यांच्या समाजापुरती मान्यता आहे. त्याला इतर समाजात मान्यता नाही.

# ऐंशीहून अधिक विद्यमान खासदारांना नारळ?

## निवडणूकची व्यूहरचना, मंत्र्यांची उमेदवारी मात्र निश्चित

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आगामी लोकसभा निवडणुकीसाठी विजयाची क्षमता हाच प्रमुख निकष लावून भाजपच्या उमेदवारांची पहिली यादी तयार करण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या उपस्थितीत शुक्रवारी पहाटे साडेतीन वाजेपर्यंत झालेल्या केंद्रीय निवडणूक समितीच्या बैठकीमध्ये विद्यमान खासदारांच्या कारभाराचा आढावा घेण्यात आला असून, ८०हून अधिक विद्यमान खासदारांची गच्छंती होण्याची शक्यता आहे.**




ज्या खासदारांची कामगिरी चांगली नसेल त्यांच्या मतदारसंघांमध्ये किमान तीन नव्या चेहऱ्यांची यादी पाठवण्यास प्रदेश भाजपला सांगितले गेले होते. या सर्व निकषांच्या आधारे गुरुवारी केंद्रीय निवडणूक समितीच्या बैठकीमध्ये मंथन झाल्याचे समजते. तीन वा त्यापेक्षा जास्त वेळा लोकसभेचे सदस्य झालेल्या खासदारांना उमेदवारी नाकारली जाऊ शकते. मोदींच्या मंत्रिमंडळातील बहुतेक विद्यमान केंद्रीय मंत्र्यांना पुन्हा उमेदवारी दिली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे अमित शहा, राजनाथ सिंह, नितीन गडकरी, स्मृति इराणी या वरिष्ठ मंत्र्यांसह धर्मेंद्र प्रधान, भूपेंदर यादव, मनसुख मंडाविया, निर्मला सीतारामन, एस. जयशंकर, पीयुष गोयल, राजीव चंद्रशेखर, प्रल्हाद जोशी, सर्बानंद सोनोवाल, ज्योतिरादित्य शिंदे, पुरुषोत्तम रुपाला, जी. किशन रेड्डी, अनुराग ठाकूर, जितेंद्र सिंह, अर्जुन मेघवाल, गजेंद्र शेखावत आदी मंत्र्यांनाही लोकसभेची उमेदवारी दिली जाऊ शकते. लोकसभाध्यक्ष ओम बिर्लाना तिसऱ्यांदा संधी मिळण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रातून नारायण राणे, भारती पवार, कपिल पाटील, भागवत कराड या मंत्र्यांनाही पुन्हा संधी दिली जाऊ शकते.ओबीसी खासदारांना पुन्हा तिकीट दिले जाणार आहे. ओबीसी हा भाजपचा प्रमुख मतदार असून या समाजातील उपजाती नाराज न होण्याची दक्षता घेतली जात आहे. २०१९ मध्ये ८५ ओबीसी उमेदवार खासदार झाले होते. त्यामुळे समितीच्या बैठकीमध्ये उत्तर प्रदेशसंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. निशाद पक्ष व सुहेलदेव भारतीय समाज पक्ष (प्रत्येकी १), अपना दल (२) अशा घटक पक्षांशी जागावाटपही निश्चित झाले आहे. याशिवाय जाटप्रभुत्व असलेल्या जयंत चौधरी यांच्या राष्ट्रीय लोकदलाशीही आघाडी झाली असून या पक्षाला २ जागा दिल्या जाणार आहेत. मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान, राजस्थानच्या माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे या वरिष्ठ नेत्यांसह क्रिकेटपटू युवराज सिंह, अक्षय कुमार, कंगना रणौत यांच्यासारख्या काही वलयांकितांची नावे चर्चेत आहेत. दिल्लीमध्ये सुषमा स्वराज यांची कन्या बांसुरी स्वराज यांना उमेदवारी दिली जाण्याची शक्यता आहे. गेल्या वेळी गाजलेल्या काही खासदारांना उमेदवारी नाकारली जाऊ शकते. त्यामध्ये भोपाळच्या खासदार प्रज्ञा ठाकूर, हर्षवर्धन, रीटा बहुगुणा, हंसराज, गौतम गंभीर, ब्रिजभूषण सिंह यांना पुन्हा संधी मिळण्याची शक्यता नसल्याचे सांगितले जाते.भाजपने उत्तर प्रदेशातील सर्वच्या सर्व ८० जागा जिंकण्याचा निर्धार केला असल्यामुळे योगी आदित्यनाथ यांच्या मंत्रिमंडळात प्रादेशिक पक्षांनाही सहभागी करून घेतले जाणार आहे. सुहेलदेव पक्षाचे ओमप्रकाश राजभर यांना मंत्री केले जाऊ शकते. जयंत चौधरी यांच्या राष्ट्रीय लोकदलाला २ मंत्रिपदे तर, निशाद पक्षाला एक मंत्रिपद दिले जाऊ शकते. राज्य मंत्रिमंडळात ८ पदे रिक्त असून किमान ६ नवे मंत्री सहभागी करून घेतले जाणार आहेत.'नमो ॲप'वर आपापल्या खासदाराबद्दलचे मत व्यक्त करण्याचे आवाहन मतदारांना करण्यात आले होते. त्यावरून खासदारांबाबत तक्रारी व त्यांच्या कामाचे मूल्यमापन केले गेले. प्रत्येक मतदारसंघामध्ये केंद्रीय मंत्री वा अन्य राज्यातील प्रमुख नेत्याला पाठवले गेले होते. त्यांच्याकडून विद्यमान खासदाराबद्दल अहवाल मागवला गेला. प्रदेश कार्यकारिणीतील सदस्यांनाही खासदारांसंदर्भातील मते देण्यास सांगितले गेले होते. या तीन स्तरांवरून विद्यमान खासदाराच्या विजयाच्या शक्यता आजमावण्यात आल्या आहेत. महाराष्ट्रातून नारायण राणे, भारती पवार, कपिल पाटील, भागवत कराड या मंत्र्यांनाही पुन्हा संधी दिली जाऊ शकते. ओबीसी खासदारांना पुन्हा तिकीट दिले जाणार आहे. ओबीसी हा भाजपचा प्रमुख मतदार असून या समाजातील उपजाती नाराज न होण्याची दक्षता घेतली जात आहे. २०१९ मध्ये ८५ ओबीसी उमेदवार खासदार झाले होते. त्यामुळे समितीच्या बैठकीमध्ये उत्तर प्रदेशसंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. निशाद पक्ष व सुहेलदेव भारतीय समाज पक्ष (प्रत्येकी १), अपना दल (२) अशा घटक पक्षांशी जागावाटपही निश्चित झाले आहे. याशिवाय जाटप्रभुत्व असलेल्या जयंत चौधरी यांच्या राष्ट्रीय लोकदलाशीही आघाडी झाली असून या पक्षाला २ जागा दिल्या जाणार आहेत.

### निशाद पक्षाला एक मंत्रिपद

मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान, राजस्थानच्या माजी मुख्यमंत्री वसुंधरा राजे या वरिष्ठ नेत्यांसह क्रिकेटपटू युवराज सिंह, अक्षय कुमार, कंगना रणौत यांच्यासारख्या काही वलयांकितांची नावे चर्चेत आहेत. दिल्लीमध्ये सुषमा स्वराज यांची कन्या बांसुरी स्वराज यांना उमेदवारी दिली जाण्याची शक्यता आहे. गेल्या वेळी गाजलेल्या काही खासदारांना उमेदवारी नाकारली जाऊ शकते. त्यामध्ये भोपाळच्या खासदार प्रज्ञा ठाकूर, हर्षवर्धन, रीटा बहुगुणा, हंसराज, गौतम गंभीर, ब्रिजभूषण सिंह यांना पुन्हा संधी मिळण्याची शक्यता नसल्याचे सांगितले जाते.भाजपने उत्तर प्रदेशातील सर्वच्या सर्व ८० जागा जिंकण्याचा निर्धार केला असल्यामुळे योगी आदित्यनाथ यांच्या मंत्रिमंडळात प्रादेशिक पक्षांनाही सहभागी करून घेतले जाणार आहे. सुहेलदेव पक्षाचे ओमप्रकाश राजभर यांना मंत्री केले जाऊ शकते. जयंत चौधरी यांच्या राष्ट्रीय लोकदलाला २ मंत्रिपदे तर, निशाद पक्षाला एक मंत्रिपद दिले जाऊ शकते.

# आज गावागावांत गरीब, मजूर, शेतकरी दु:खी आहे

## गांधीजी होते तेव्हा 90 टक्के लोकसंख्या गावात राहात : नितीन गडकरी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्रीय मंत्री नितीन गडकरी त्यांच्या रोखठोक स्वभावामुळे सर्वपरिचित आहेत. त्याशिवाय त्यांच्या विविध उपक्रमांबाबतच्या संकल्पनाही चर्चेचा विषय ठरतात. या गोष्टी मांडताना आपल्याच सरकारमधील चुकीच्या गोष्टींवर बोट ठेवण्यातही गडकरी मागेपुढे पाहात नाहीत.**



या पार्श्वभूमीवर सध्या पंजाब, हरियाणातील शेतकऱ्यांनी दिल्लीच्या सीमारेषांवर छेडलेल्या आंदोलनाबाबत नितीन गडकरींनी 'लल्लनटॉप'ला दिलेल्या मुलाखतीत भूमिका मांडली आहे. त्यात देशातला शेतकरी, मजूर, गरीब आज दु:खी असल्याचं गडकरी म्हणाले आहेत. काँग्रेसनं यासंदर्भातला व्हिडीओ शेअर केला आहे.शेतकरी आंदोलनाबाबत नितीन गडकरींना प्रश्न विचारला असता त्यांनी त्यावर स्पष्टीकरण दिलं. "तांदूळ, मका, साखर, गव्हाचं अतिरिक्त उत्पादन हा मुद्दा महत्त्वाचा आहे. हरियाणामध्ये तर गहू आणि तांदूळ ठेवण्यासाठी रेल्वेचे प्लॅटफॉर्म वापरावे लागले. आपल्याकडे साठवणुकीची पुरेशी व्यवस्था नाहीये", असं नितीन गडकरी यावेळी म्हणाले."शेती उत्पादनांचा भाव मागणी व पुरवठ्यानुसार ठरतो. पण आपल्याकडे धान्याच्या किमतींमध्ये फारसे बदल होत नाहीत. त्यामुळे शेती आर्थिकदृष्ट्या परवडेनाशी झाली. माझ्या आयुष्याचं ध्येय हे आहे आहे की या देशाचा शेतकरी फक्त अन्नदाता नसून ऊर्जा उत्पादकही व्हावा", अशी भूमिका गडकरींनी मांडली."देशाच्या विकासात कृषी क्षेत्रातील विकासाचा जीडीपीमधील हिस्सा १२ टक्के आहे, उत्पादन क्षेत्राचा हिस्सा २२ ते २४ टक्के तर सेवा क्षेत्राचा हिस्सा ५२ ते ५४ टक्के आहे.

### सरकार आल्यानंतर खूप काम

कृषी विभागावर ६५ टक्के लोकसंख्या अवलंबून आहे. गांधीजी होते तेव्हा ९० टक्के लोकसंख्या गावात राहात होती. हा ३० टक्क्यांचा फरक कसा पडला? कारण आज गावोगावचा मजूर, शेतकरी दु:खी आहे. कारण जल, जमीन, जंगल आणि जनावर, ग्रामीण, शेती, आदिवासी भाग या ठिकाणी चांगले रस्ते नाहीत. पिण्यासाठी शुद्ध पाणी नाहीये. चांगली रुग्णालयं नाहीत. चांगल्या शाळा नाहीत. शेतकऱ्यांच्या उत्पादनांना चांगले दर मिळत नाहीत", अशा शब्दांत गडकरींनी समस्येवर बोट ठेवलं."ग्रामीण भागात, शेती क्षेत्रात शाश्वत विकास झाला आहे. पण ज्या प्रमाणात इतर क्षेत्रांत विकास झाला, तेवढा झाला नाही. आमचं सरकार आल्यानंतर आम्हीही खूप काम केलं.

# रवी किशन यांनी सांगितला 'तेरे नाम'च्या सेटवरील अनुभव

आजच्या पिढीतील तरुणांसाठी 'कबीर सिंग'सारखी टॉक्सिक आणि इंटेन्स लव्हस्टोरी आजतागयात झालेली नाही असं आपण कधीच म्हणू शकत नाही. बॉलिवूडचा भाईजान सलमान खान याने हा प्रयोग बऱ्याच वर्षांपूर्वी 'तेरे नाम'सारख्या चित्रपटातून केला अन् त्याला लोकांनी अक्षरशः डोक्यावर घेतलं. 'तेरे नाम'चं नाव जरी घेतलं तरी निर्जराच्या प्रेमात आकंठ बुडालेला, तिच्याशी लग्न करण्यासाठी वेडापिसा झालेला राधे हा आजही आपल्या सगळ्यांच्या डोळ्यासमोर उभा राहतो. पण तुम्हाला माहितीये का कि 'तेरे नाम'च्या चित्रीकरणादरम्यान सलमान खान हा काहीसा असाच विक्षिप्त वागायचा.खुद्द रवी किशन यांनीच या गोष्टीचा खुलासा केला आहे. रवी किशन यांनी 'तेरे नाम'मध्ये एक छोटी पण महत्त्वाची भूमिका निभावली होती. 'दी लल्लनटॉप'शी संवाद साधतांना चित्रीकरणादरम्यान रवी किशन यांना आलेला अनुभव आणि सेटवर सलमानचा स्वभाव याबद्दल भाष्य केलं आहे. कारण त्यावेळी सलमानच्या खासगी आयुष्यात बरीच उलथापालथ सुरू होती, अन् यामुळेच रवी किशन हे सलमानपासून चार हात लांबच राहायचे.याविषयी खुलासा करताना रवी किशन म्हणाले, "तेरे नामच्या सेटवर मी जास्त त्यांच्यात लुडबूड करायचो नाही, कारण त्यांचं पात्र राधे हे फारच गुंतागुंतीचं आणि गडद होतं. दिग्दर्शक सतीश कौशिक सुद्धा यांची हीच इच्छा होती, बहुतेक सलमानसुद्धा त्याच्याच पात्रात हरवून गेला होता. सेटवर मी सलमानपासून एक ठराविक अंतर ठेवूनच वावरायचो." चित्रीकरणानंतर रवी किशन हे सलमानला भेटायचे, अन् त्यानंतरच हळूहळू त्यांच्यात मैत्री झाली. नंतर दोघे मिळून रात्रीचे जेवण एकत्रच करत असत. त्यावेळी रवी किशनविषयी सलमानला बरीच माहिती होती.

'तेरे नाम' २००३ मध्ये प्रदर्शित झाला अन् तेव्हा चांगलाच गाजला. प्रेक्षकांना सलमानचं पात्र आणि कथेचं सादरीकरण प्रचंड भावलं. या चित्रपटातून सलमान खानबरोबर अभिनेत्री भूमिका चावला हिने बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं. याबरोबरच तिने दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतही काम केलं आहे. रवी किशन यांनीही या चित्रपटात महत्त्वाची भूमिका निभावली होती. रवी किशन हे भोजपुरी चित्रपटसृष्टीचे एक मोठे स्टार आहेत.

## आमिर खानचा लेक बॉलीवूडसाठी सज्ज

बॉलीवूडचा मिस्टर परफेक्शनिस्ट आमिर खान नेहमी चर्चेत असतो. आमिरने आपल्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे. आता आमिरप्रमाणे त्याचा मोठा मुलगा जुनैद खान बॉलीवूडमध्ये पदार्पण करणार आहे. गेल्या अनेक दिवसांपासून जुनैदच्या बॉलीवूड पदार्पणाची चर्चा रंगली होती. जुनैदचा पहिला चित्रपट 'महाराजा' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकताच या चित्रपटाचा टिझर प्रदर्शित करण्यात आला आहे. हा चित्रपट एका ऐतिहासिक महाकाव्यावर बेतलेला असल्याचे सांगण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार या चित्रपटात जुनैद एका पत्रकाराची भूमिका साकारत आहे. मात्र, चित्रपटाच्या फर्स्टलूकमध्ये जुनैदची भूमिका व लूकबाबत कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. आमिर खान प्रोडक्शन या बॅनरखाली 'महाराजा' चित्रपटाची निर्मिती करण्यात येत आहे. काही दिवसांपूर्वीच 'महाराजा' चित्रपटाच्या सेटवरचे जुनैदचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. या चित्रपटात जुनैदबरोबर साई पल्लवी, शालिनी पांडे, शरवरी वाघ आणि जयदीप अहलावत यांच्या प्रमुख भूमिका आहेत. बॉलीवूडमध्ये येण्याअगोदर जुनैदने तब्बल सात वर्षे रंगभूमीवर अभिनयाचे प्रशिक्षण घेतले आहे. अमेरिकन अकॅडमी ऑफ ड्रॅमॅटिक आर्ट्स, लॉस एंजेलिसमधून त्याने अभिनयाचे प्रशिक्षण घेतले आहे.

## दिशा योद्धा चित्रपटामुळे चर्चेत



अभिनेत्री दिशा पाटनी 'योद्धा'या तिच्या आगामी चित्रपटामुळे चर्चेत आहे. या ॲक्शन चित्रपटाच्या ट्रेलर लॉंचचा कार्यक्रम गुरुवारी आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये निर्माता करण जोहर, अभिनेता सिद्धार्थ मल्होत्रा, अभिनेत्री राशी खन्ना आणि दिशा पाटनी यांच्यासह 'योद्धा' च्या संपूर्ण टीमने हजेरी ला व ली होती. या कार्यक्रमात दिशाने,जेव्हा ती मॉडेलिंग करत होती तेव्हा करणने ति ला पाहिलं आणि अभिनेत्री म्हणून काम करण्याची संधी दिली, असा खुलासा केला.दिशा पाटनी म्हणाली, "मी आज अभिनेत्री आहे ती फक्त करण जोहरमुळे. कारण तोच होता ज्याने मला मॉडेलिंग करताना पाहिलं होतं आणि तेव्हा मी केवळ १८ वर्षांची होते. मला अजूनही असं वाटत जर करणने तेव्हा मला पाहिलं नसत तर मी आज या क्षेत्रात नसते. लोक करणबद्दल जे काही बोलतात त्याचा मला फरक पडत नाही. मी या इंडस्ट्रीमधली नाही म्हणून मला असं वाटतं की ही संधी मला करणमुळेच मिळाली आहे."दिशाच्या या विधानानंतर, करण तिला 'आय लव्ह यू' म्हणाला. या संभाषणात सिद्धार्थनेही भाग घेतला आणि त्यानेही करणचं कौतुक केलं. "असली हिरे की पेहेचान 'जोहर' को ही है," असं सिद्धार्थ म्हणाला.दरम्यान, दिशाच्या कामाबद्दल सांगायचं झालं तर, 'एम एस धोनी: द अनटोल्ड स्टोरी' या चित्रपटातून दिशाने हिंदी सिनेसृष्टीत पदार्पण केलं. यासाठी तिला आंतरराष्ट्रीय भारतीय चित्रपट अकादमीचा (IIFA) पुरस्कारही मिळाला होता. त्यानंतर दिशा 'बागी २', 'मलंग', 'एक विलन रिटर्न्स' यांसारख्या चित्रपटांमध्ये दिसली होती. आता 'योद्धा'या आगामी चित्रपटात दिशा झळकणार आहे. हा चित्रपट १५ मार्च २०२४ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.या ॲक्शन चित्रपटाच्या ट्रेलर लॉंचचा कार्यक्रम गुरुवारी आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये निर्माता करण जोहर, अभिनेता सिद्धार्थ मल्होत्रा, अभिनेत्री राशी खन्ना आणि दिशा पाटनी यांच्यासह 'योद्धा' च्या संपूर्ण टीमने हजेरी लावली होती.

## रकुल -जॅकी भगनानी पोहोचले अमृतसरला

बॉलीवूड अभिनेत्री रकुल प्रीत सिंग आणि अभिनेता जॅकी भगनानी यांचा लग्नसोहळा २१ फेब्रुवारी २०२४ रोजी गोव्यात पार पडला. वरुण धवनपासून ते शिल्पा शेट्टी, अक्षय कुमारपर्यंत बॉलीवूडमधील अनेक कलाकारांनी या लग्नसोहळ्याला हजेरी लावली होती.

रकुल प्रीत सिंग व जॅकी भगनानी यांचं शीख आणि सिंधी या दोन्ही पद्धतीत लग्न झालं. मेहंदी, संगीत, हळद आणि लग्न या सगळ्या विधींचे फोटो सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाले. लग्न झाल्यानंतर मुंबईत येताच या नवविवाहित जोडप्याने पापाराझींना मिठाई वाटली. आता रकुल प्रीत सिंग आणि जॅकी भगनानी त्यांच्या कुटुंबासह अमृतसरला गेले आहेत.लग्नगाठ बांधल्यानंतर देवाचे आशीर्वाद घेण्यासाठी हे नवविवाहित जोडपं आता अमृतसरला पोहोचलं आहे. १६ व्या शतकापासून अमृतसर हे शीख समुदायाचे मुख्य धार्मिक स्थान राहिलं आहे. येथील सुवर्ण मंदिर हे 'अमृत तलावा'च्या काठी आहे.अमृतसरमधील फोटो रकुल प्रीत सिंगने तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर शेअर केले आहेत. पहिल्या फोटोमध्ये रकुल आणि जॅकी अमृतसरमधील सुवर्ण मंदिराजवळ उभे आहेत. यात रकुलने पिवळ्या रंगाचा चिकनकारी ड्रेस घातला आहे, तर जॅकीने लाल रंगाचा कुरता परिधान केला आहे. या फोटोला 'ब्लेस्ड' (BLESSED) असं कॅप्शन देत 'इक ओंकार' हे गाणं रकुलने या फोटोला जोडलं आहे. अमृतसरला या जोडप्याबरोबर रकुलचे आई- वडीलसुद्धा आले आहेत.लग्न होण्याआधी रकुल आणि जॅकी सिद्धीविनायक मंदिरात आशीर्वाद घेण्यासाठी पोहोचले होते. दोघांनीही एकमेकांच्या संस्कृतीचा आदर करत दोन्ही पद्धतीत लग्न केलं आहे. रकुल आणि जॅकीने त्यांच्या लग्नातील पोशाखासाठी तरुण तहिलियानी या डिझायनरची निवड केली होती. दरम्यान, रकुल व जॅकीच्या प्रेमकहाणीबद्दल सांगायचं झालं.



## करिश्मा कपूरला नेटकऱ्यांनी केलं ट्रोल

अभिनेत्री करिश्मा कपूरने आपल्या अभिनयाच्या जोरावर बॉलीवूडमध्ये स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली. ९० च्या दशकात अनेक गाजलेल्या चित्रपटांमध्ये करिश्माने काम केले होते. गेल्या अनेक वर्षांपासून करिश्मा मोठ्या पडद्यापासून दूर आहे, परंतु सध्या ती एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आली आहे. नुकतंच करिश्माने 'हार्वर्ड बिझनेस स्कूल'ला भेट दिली व तिथे 'हार्वर्ड इंडिया कॉन्फरन्स'मध्ये तिने सहभाग घेतला होता. करिश्माने तिच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर या इव्हेंटचे काही फोटोज शेअर केले जे सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाले. लोकांनी आणि सेलिब्रिटीजनी करिश्माचं कौतुक केलं, पण काहींनी मात्र तिला भरपुर ट्रोलही केलं आहे. नेटकऱ्यांनी करिश्माला ट्रोल करत तिच्या शिक्षणावर आणि बौद्धिक कुवतेवर प्रश्नचिन्ह उभं केलं आहे.मीडिया रिपोर्टनुसार करिश्मा कपूरने पदवीचं शिक्षण घेतलेलं नसून तिने केवळ १२वी पर्यंतच शिक्षण घेतलं आहे. पुढे तिने पदवीसाठी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला होता, परंतु चित्रपटात पदार्पण केल्याने तिचा शिक्षणातील रस निघून गेला अन् तिने कॉलेजचं शिक्षण अर्धवटच सोडून दिलं. यामुळेच तिला आता नेटकरी ट्रोल करत आहेत.

# म्हणून रोहितला कर्णधार बनवलं !

## एमएस धोनीला एमएस धोनी व्हायला 20 वर्षे लागली' : गांगुली

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**बीसीसीआयचे माजी अध्यक्ष सौरव गांगुली यांनी टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्माबाबत मोठा खुलासा केला आहे. कर्णधार म्हणून त्याने रोहित शर्माचे खूप कौतुक केले आहे. गांगुलीच्या म्हणण्यानुसार, रोहित शर्माने त्याच्या नेतृत्वाखाली भारताला विश्वचषकाच्या अंतिम फेरीत नेले होते आणि त्यामुळेच त्याच्या कर्णधारपदावर कधीही शंका आली नाही. २०२१ मध्ये विराट कोहलीच्या जागी रोहित शर्माला मर्यादित षटकांच्या फॉरमॅटमध्ये टीम इंडियाचा कर्णधार बनवण्यात आले होते.**





जानेवारी २०२२ मध्ये विराट कोहलीनेही कसोटी फॉरमॅटच्या कर्णधारपदावरून पायउतार होण्याची घोषणा केली होती. यानंतर रोहित शर्मा तिन्ही फॉरमॅटमध्ये टीम इंडियाचे नेतृत्व करत आहे. विराट कोहलीच्या राजीनाम्यानंतर रोहित शर्माला अचानक एकदिवसीय आणि टी-२० संघाचे कर्णधार नियुक्त करण्यात आले. यानंतर त्याच्याकडे कसोटी संघाची कमानही सोपवण्यात आली होती. आयपीएलमधील कर्णधारपदाच्या अनुभवामुळे रोहित शर्माला भारतीय संघाचा कर्णधार नियुक्त करण्यात आले. त्याच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाची कामगिरी आतापर्यंत चांगली राहिली आहे.रेवस्पोर्टझशीशी संवाद साधताना सौरव गांगुलीने रोहित शर्माच्या कर्णधारपदावर प्रतिक्रिया दिली. तो म्हणाला, "विश्वचषकात त्याने भारतीय संघाचे किती उत्कृष्ट नेतृत्व केले होते. त्याने भारताला अंतिम फेरीत नेले. माझ्या मते, अंतिम सामन्यातील पराभवापर्यंत भारत २०२३ च्या विश्वचषकातील सर्वोत्तम संघ होता. त्यामुळे माझ्या मते रोहित शर्मा एक उत्कृष्ट कर्णधार आहे."सौरव गांगुली पुढे म्हणाला, "त्याने अनेक आयपीएल ट्रॉफी जिंकल्या आहेत. त्याने आजवर ज्या प्रकारे कर्णधारपद भूषवले आहे, त्याचे मला आश्चर्य वाटत नाही. मी जेव्हा बीसीसीआयचा अध्यक्ष होतो, तेव्हा तो संघाचा कर्णधार होता. मी त्याला कर्णधार या कारणासाठी बनवले होते, कारण मी त्याच्यातील प्रतिभा पाहिली होती." रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ टी-२० विश्वचषकात उपांत्य फेरीत पोहोचला होता. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाची कामगिरी अतिशय उत्कृष्ट राहिली आहे. रोहित शर्माने तिन्ही फॉरमॅटसह १०० हून अधिक आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये टीम इंडियाचे नेतृत्व केले आहे. या काळात रोहित शर्माने टीम इंडियाला ७० टक्क्यांहून अधिक सामन्यांमध्ये विजय मिळवून दिला आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली टीम इंडिया आयसीसी एकदिवसीय विश्वचषकाची अंतिम फेरी गाठण्यात यशस्वी ठरली.भारत आणि इंग्लंडमध्ये सध्या पाच सामन्यांची कसोटी मालिका सुरू आहे. मालिकेतील चौथा सामना रांची येथील जेएससीए इंटरनॅशनल स्टेडियमवर खेळला गेला, जिथे टीम इंडियाने रोमहर्षक विजयाची नोंद केली. टीम इंडियाला रांची कसोटी सामना जिंकून देण्यात सर्वात महत्त्वाची भूमिका बजावणारा खेळाडू म्हणजे ध्रुव जुरेल. त्याने दोन्ही डावात संघासाठी शानदार कामगिरी केली. ज्यामुळे सामनावीर पुरस्काराने सन्मानित केले. यानंतर सुनील गावसकरांनी त्याची तुलना एमएस धोनीशी केली.

### तो दुसरा उदयोन्मुख धोनी

» ध्रुव जुरेलने पहिल्या डावात ९० धावा केल्या, तर दुसऱ्या डावात ३९ धावांची नाबाद खेळी साकारली. जुरेलला त्याच्या दोन्ही डावात उत्कृष्ट फलंदाजी आणि यष्टिरक्षणासाठी सामनावीराचा पुरस्कार मिळाला. ध्रुव जुरेलची ही कामगिरी पाहून माजी कर्णधार सुनील गावसकरही खूप खूश झाले. त्यांनी युवा यष्टिरक्षकाची तुलना एमएस धोनीशी केली. मात्र, सौरव गांगुली त्यांच्या या वक्तव्यावर खूश नसून आता जुरेलची धोनीशी केलेल्या तुलनेवर प्रतिक्रिया दिली आहे. रेवस्पोर्टझशी संवाद साधताना दादा म्हणाले, "ध्रुव जुरेलने कठीण विकेटवर दडपणाखाली शानदार कसोटी सामना खेळला. त्याच्याकडे खूप प्रतिभा आहे आणि जर त्याने ही संधी गमावली तर पुनरागमन करणे खूप कठीण होईल. एमएस धोनी हा एक वेगळ्या प्रकारचा खेळाडू. जुरेलमध्ये प्रतिभा आहे, यात शंका नाही. पण एमएस धोनीला एमएस धोनी व्हायला २० वर्षे लागली. खरं तर धोनीला धोनी व्हायला १५ वर्षे लागली. त्यामुळे जुरेलला खेळू द्या.खरं तर, चौथ्या कसोटी सामन्यात समालोचन करताना सुनील गावसकर म्हणाले होते, "नक्कीच त्याने चांगली फलंदाजी केली आहे, पण त्याची किपिंग आणि यष्टीमागे त्याचे काम तितकेच उत्कृष्ट आहे. त्याच्या खेळातील जागरुकतेकडे पाहून मला असे म्हणायचे आहे.

# कॅमेरून ग्रीनचे द्विशतक नक्कीच हुकले

## कॅमेरूनच्या शतकाने सावरला ऑस्ट्रेलियाचा डाव

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**वेलिंग्टन येथे यजमान न्यूझीलंड आणि यांच्यात पहिला कसोटी सामना खेळला जात आहे. या सामन्याक कॅमेरून ग्रीनने ऐतिहासिक खेळी खेळून ऑस्ट्रेलिया-न्यूझीलंड कसोटी सामना अतिशय रोमांचक बनवला आहे. वेलिंग्टन कसोटी सामन्यात एकेकाळी यजमान न्यूझीलंडने ऑस्ट्रेलियाला ९ विकेट्सवर २६७ धावांत गुंडाळले होते.**

पण यानंतर कॅमेरून ग्रीनने किवी गोलंदाजांना क्रिकेटमधील असा धडा शिकवला जो ते सहजासहजी विसरणार नाहीत. अष्टपैलू ग्रीनने एका बाजूने तुफानी फलंदाजी करत धावसंख्या २६७/९ वरून ३८३ पर्यंत नेली.शेवटचा फलंदाज बाद झाल्यामुळे कॅमेरून ग्रीनचे द्विशतक नक्कीच हुकले, पण कसोटी इतिहासातील सर्वोत्तम खेळी म्हणून त्याच्या खेळीची नोंद केली जाईल. चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या कॅमेरून ग्रीनचे हे दुसरे कसोटी शतक आहे. त्याने जोश हेझलवूडसोबत शेवटच्या विकेटसाठी ११६ धावांची ऐतिहासिक भागीदारी केली आणि संघाला ३८३ धावांपर्यंत मजल मारली. न्यूझीलंडविरुद्ध कोणत्याही संघाच्या फलंदाजांनी दहाव्या विकेटसाठी सर्वात मोठ्या भागीदारीचा हा विक्रम आहे. १०व्या विकेटसाठीच्या एकूण



सर्वात मोठ्या भागीदारीबद्दल बोलायचे, तर हा विक्रम इंग्लंडच्या जो रूट आणि जेम्स अँडरसनच्या नावावर आहे. २०१४ मध्ये भारताविरुद्धच्या नॉटिंगहॅम कसोटी सामन्यात जो रूट आणि जेम्स अँडरसन यांनी १९८ धावा केल्या होत्या.सामन्याच्या पहिल्या दिवशी ऑस्ट्रेलियाने ९ गड्यांच्या मोबदल्यात २७९ धावा केल्या होत्या. त्यानंतर कॅमेरून ग्रीन १०३ आणि जोश हेझलवूड (०) नाबाद होते. सामन्याच्या दुसऱ्या दिवशी न्यूझीलंड ऑस्ट्रेलियाला ३०० धावांच्या आत बाद करेल, असे वाटत असेल, पण कॅमेरून ग्रीनने काही वेगळाच विचार केला होता. त्याने जोश हेझलवूडसोबत शेवटच्या विकेटसाठी ११६ धावांची ऐतिहासिक भागीदारी केली आणि संघाला ३८३ धावांपर्यंत मजल मारली.कॅमेरून ग्रीनने या डावात २७५ चेंडूत १७४ धावा केल्या. या खेळीत त्याने २३ चौकार आणि ५ षटकार मारले. कॅमेरून ज्या पद्धतीने खेळत होता, त्यावरून तो द्विशतक पूर्ण करेल असे वाटत होते.

### ग्रीनने संघापेक्षा केल्या जास्त धावा

» कॅमेरून ग्रीनच्या खेळीचे महत्त्व यावरून समजू शकते की संघाचे इतर १० फलंदाजही त्याने जितक्या धावा काढल्या तितक्या धावा करू शकले नाहीत. ग्रीनने १७४ धावा केल्या, तर ऑस्ट्रेलियाच्या उर्वरित १० फलंदाजांनी १६८ धावा केल्या. ग्रीननंतर ऑस्ट्रेलियाचा दुसरा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज मिचेल मार्श ठरला. त्याने ४० धावांची खेळी केली. न्यूझीलंडने ऑस्ट्रेलियाला अतिरिक्त ४१ धावांची भेट दिली. प्रत्युत्तरात न्यूझीलंडचा पहिला १७९ धावांवर गारद झाला. न्यूझीलंडकडून ग्लेन फिलिप्सने सर्वाधिक ७१ धावांचे योगदाने दिले. त्याचबरोबर ऑस्ट्रेलियाकडून नॅथन लायनने सर्वाधिक ४ विकेट्स घेतल्या. त्यानंतर ऑस्ट्रेलियाने दुसऱ्या दिवसअखेर दुसऱ्या डावात २ बाद १३ धावा केल्या असून ख्वाजा आणि लायन नाबाद आहेत.